# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २० मार्च २०१५

## मुंबई विद्यापीठाच्या गरवारे संस्थेचा हवाई विद्यापीठाशी सामंजस्य करार

मुंबई - आजमितीला झपाट्याने विकसित होणा-या पर्यटन क्षेत्रातील बदलांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकत मुंबई विद्यापीठाच्या गरवारे इन्स्टीट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन एन्ड डेव्हलपमेंट या संस्थेने हवाई विद्यापीठाच्या कॅपिओलॉनी कम्युनिटी महाविद्यालयाशी सामंजस्य करार केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षणक्रमात देवाण –घेवाण आणि या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी हे महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या करारान्वये गरवारे संस्थेत टुरीझम आणि ट्रॅव्हल इंडस्ट्री मॅनेजमेंट चा शिक्षणक्रम घेणा-या विद्यार्थ्यांना कॅपिओलॉनी कम्युनिटी महाविद्यालयात इंटर्नशिप करता येणार तसेच त्यांच्याकडील विद्यार्थ्यांना या संस्थेत शिकता येणार एवढच नव्हे तर फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्राम,कोर्स मटेरियल,टेलेकॉन्फरंसिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळू शकेल.त्याचबरोबर सहकार्याच्या भागीदारीतून स्टुडेंट एक्सचेंज,फॅकल्टी आणि स्टाफ एक्सचेंज,ऑप्टीकल प्रॅक्टीकल ट्रेनिंग प्रोग्राम,अप्लाईड रिसर्च प्रोग्राम,शॉर्ट टर्म ट्रेनिंग प्रोग्राम या बाबींवर अधिक भर देण्यात आला आहे. मुंबई विद्यापीठाच्या गरवारे संस्थेत दोन वर्षाचा पूर्णवेळ टुरिझम अँड ट्रॅव्हल इंडस्ट्री मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम राबविला जात आहे.

दिवंसेदिवस पर्यटन क्षेत्रात झपाट्याने वाढ होत असून ,पर्यटन आणि हॉस्पिटॅलिटी व्यवस्थापन क्षेत्रालाही मोठी मागणी येत असल्याचे दिसून येत आहे. भारतात तसेच परदेशात पर्यटनाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. या व्यवसायामुळे सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रात व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. पर्यटन क्षेत्रात काम करताना टूर अरेंज करणे , हॉटेल बुकिंग करणे, जेवणाची सोय करणे, राहण्याची व्यवस्था करणे, तिकीट बुक करणे इ. अनेक गोष्टींचा समावेश होतो. पूर्वीपेक्षा आता पर्यटन क्षेत्रात अनेक कंपन्या येत आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील कामाच्या संधी वाढत आहेत.

पर्यटन हे रोजगार तसेच परकीय गुंतवणुकीला चालना देणारे क्षेत्र आहे. केंद्र व राज्य सरकारशी संबंधित संस्थादेखील या क्षेत्राला प्रोत्साहन देतात.आधुनिक युगाच्या मागणीनुसार या अभ्यासक्रमात महत्वाचे बदल करत हे महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)